# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१०/०३/२०१९
## दि.०९/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे १५८/१९,भादविक ३०७,३९४,३९७,५०४,५०६,३४ |
| **फिर्यादी** | संदिप बोडके,वय-२९,रा,शिक्रापूर,ता.शिरुर,जि.पुणे./मुळ गाव ता.उमरगा,जि.उस्मानाबाद |
| **आरोपी** | १)करण दगडू लंबाटे,वय २१ वर्षे,रा.स.नं.३२,विश्वकार्मा गॅरेजजवळ, दांडेकर पूल,पुणे २) एक अनोळखी इसम नाव पत्ता माहित नाही (अ.क्र.१ अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०३/२०१९ रोजी सायंकाळी १९/०० वा चे सुमारास सर्वे नं.१३२, इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ,मनपा बसस्टॉपच्या पाठीमागे,स्टेट बँक को.ओप.सोसा.समोरील फुटपाथवर,सिंहगड रोड,दांडेकर पूल पुणे. |
| **तपशिल** | यातील फ़िर्यादी हे नमूद तारीख, व ठिकाणाहुन सायंकाळी स्वारगेट चौक येथून रिक्षामध्ये बसून दांडेकरपूल पेट्रोलपंपा समोर सायं. १९/०० वा चे सुमारास आले असता रिक्षामध्ये त्यांचे शेजारी बसलेला करण लंबाटे याने फिर्यादी यांचे हातातील मोबाईल जबरीने हिसकावून घेवून शिवीगाळ व दमदाटी करीत डोक्यात फायटरने मारुन गंभीर जखमी केले व रिक्षा चालकाने फिर्यादीच्या पॅन्टच्या उजव्या खिशातील रोख रक्कम ७,०००/-रु जबरीने काढून घेतले.त्यानंतर ते तेथून निघून जात असताना पेट्रोल पंपाच्या जवळील बस स्टॉपच्या पाठीमागे फुटपाथवर त्या दोघांनी फिर्यादीच्या पाठीमागून येवून रिक्षा चालकाने त्यांना पकडून ठेवले व करण लंबाटे याने फुटपाथवर पडलेल्या सिमेंटच्या गट्टुने फिर्यादीच्या डोक्यात मारहाण करुन गंभीर जखमी करीत जीवे ठार मारण्याचा प्रयत्न |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.बी.साळवे ७५८८१७५१८८ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे २२५/१९,भादविक ३०७ |
| **फिर्यादी** | मुकेश ऊर्फ मुलाराम सोळंकी वय-२३ रा. हडपसर,पुणे |
| **आरोपी** | लक्ष्मण गणेश रनशिंगे वय २१ वर्ष रा.गोसावी वस्ती कॅनल जवळ,हडपसर,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०३/२०१९ रोजी सायंकाळी १९/२० वा च्या सुमारास स नं. १०६, गोसावी वस्ती कॅनल जवळ, हडपसर येथील पुजा जनरल स्टोअर्स नावाचे किराणा मालाचे दुकाना समोर |
| **तपशिल** | यातील फ़िर्यादी हे व त्यांचा भाऊ सखाराम असे सायंकाळी १९/२० वा च्या सुमारास स नं. १०६, गोसावी वस्ती कॅनल जवळ, हडपसर येथील पुजा जनरल स्टोअर्स नावाचे किराणा मालाचे दुकानात असताना यातील नमुद इसम लक्ष्मण गणेश रनशिंगे यांने फिर्यादी यांचे भावास दुकाना बाहेर बोलावुन त्यास उधारीवर किराणा माल दिला नाही याचा राग मनात धरुन त्यांने फिर्यादीस व त्यांचे भावास त्याच्या जवळील धारदार शस्त्राने भोकसुन व वार करुन गंभिर दुखापत करुन जीवे ठार मारण्याचा प्रयत्न |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.यु.व्हि.पुणे ९४०३१८८३१८ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भा.विघ्यापीठ पो स्टे २०५/१९,भादविक ३०७,३२६,३४ सह आर्म ॲक्ट कलम ४/२५ सह ३७/१ सह १३५ |
| **फिर्यादी** | प्रथमेश ऊर्फ अभय कडले वय २८ वर्षे रा.दत्तनगर आबेगाव बुा पुणे |
| **आरोपी** | १)एक विधीसंर्षीत बालक वय १७ वर्षे रा.शनिनगर चौक आंबेगाव पुणे २) एक विधीसंर्षीत बालक वय १५वर्षे रा. धायरी नऱ्हेगाव पुणे (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/०३/२०१९ रोजी सकाळी १०.३० वा ते १०.४५ वा चे दरम्यान अभिनव कॉलेज परिसरात मध्ये आबेगाव बु पुणे |

**तपशिल** यातील फिर्यादी यांची फिर्याद की यातील नमुद इसम यांनी जुन्या भांडणाच्या कारणावरुन वर नमुद केले तारीख वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचेवर लोखंडी कोयत्याने वार करुन फिर्यादीस जबर जखमी करुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी.बडे ९८३४२९५५९९

**४**

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे २२७/१९,भादविक २७९,३०४(अ) मो वा का ११९/१७७

**फिर्यादी** एम पी साळवी पो.ना हडपसर पोलीस स्टेशन पुणे शहर

**आरोपी** राजु प्रभु पवार वय २८रा.ढमाळवाडी भेकराईनगर फुरसुंगी ता हवेली जि.पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दिनांक ०९/०३/२०१९ रोजी सांयकाळी १८/१५ वाजताचे बेल्हेकरवस्ती गजानन महाराज मंदिरासमोर मांजरी ब्रु बसस्टॉप वरती हडपसर पुणे

**तपशिल** यातील फिर्यादीची फिर्याद की वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी यातील मयत महिला नामे शालन सुरेश घुले वय ५९ रा बेल्हेकर वस्ती गणपती मंदिरासमोर मांजरी ब्रु ता हवेली जि पुणे या हडपसर मांजरी पी.एम.पी.एल.बस मधुन प्रवास करित बेल्हेकर वस्ती गजानन महाराज मंदिरा समोर मांजरी ब्रु बससस्टॉप आलेनंतर त्या बसचे पुढील दरवाज्या मधुन उतरत असताना त्यांचा एक पाय खाली जमीनीवर व एक पाय शेवटचे पायरीवर असताना पी.एम.पी.एल बस वरील चालक राजु पवार याने त्याचे ताब्यातील बस सुरु केल्यामुळे त्यांचा तोल जावुन ते खाली पडल्यानंतर बस वरील चालकाने बस अविचाराने व हयगयीने चालवुन बसचे पाठीमागील डावे बाजुचे चाक त्यांचे डोक्यावरुन घालवुन तिस गंभीर जखमी करुन त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला.

**त.अंमलदार** सहा.पो.निरी.डी.डी गाडे ८८८८७९९६९

**५**

**पो.स्टे.गुरनं./कलम** समर्थ पो स्टे ५४/१९,भादविक ४१७,४२०

**फिर्यादी** एक महिला वय ५३ वर्ष,रा.न्यु नाना पेठ.पुणे

**आरोपी** एक अनोळखी इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०९/०३/२०१९ रोजी ११/०० वा.च्या सुमारास डॉ.शहा क्लिनिक, पदमजी कंपाऊड, भवानी पेठ, पुणे यांच्या क्लिनिकजवळ

**तपशिल** यातील फिर्यादी हया वर नमुद केले ता.व ठिकाणाहुन नातवास शाळेतुन आणण्यासाठी जात असताना साधारण ११/०० वा.च्या सुमारास फिर्यादी हया आय.सी.सी.केबल नेटवर्क प्रायव्हेट लिमिटेड या ऑफिसच्या अलिकडे आले असता, यातील अनोळखी इसमाने मोफत साडी देण्याचे आमिष दाखवुन डॉ. शहा क्लिनिक, पदमजी कंपाऊड, भवानी पेठ, पुणे यांच्या क्लिनिकजवळ नेऊन त्याचेकडे असलेल्या १०० रु.नोटे मध्ये फिर्यादी यांचे सोन्याचे कानातले व वेल हातचलाखीने पुडीत बांधुन त्याएवेजी १०० रु. नोटेची दुसरीच पुडी फिर्यादी यांना देऊन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांचे संमती शिवाय व लबाडीने एकुण २७,५०० रु. किंमतीचे सोन्याचे दागिणे चोरुन नेवुन फसवणुक केली आहे.

**त.अंमलदार** पो.हवा.आर.वाय.होले ८४५९७५२५६०

**६**

**पो.स्टे.गुरनं./कलम** वारजे पो स्टे ९६/१९,भादविक ३९५,३२३,५०४,५०६(२),४२७ महा पोलीस अधिनियम कलम ३७(१) सह १३५, आर्म ॲक्ट कलम ४(२५)

**फिर्यादी** सुरज चव्हाण,वय १९ वर्षे,रा.शिवणे,पुणे

**आरोपी** १) अभिजीत भंडारी वय.१९ वर्षे ५)शेखर खवळे वय १९ वर्षे ३)अनिकेत भोंडवे वय २० वर्षे रा.सर्व रामनगर वारजे पुणे (अटक) व इतर तीन

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०८/०३/२०१९ रोजी २१/३० वा सुमारास आनंतप्रभा सोसायटी,डि,बिल्डींगचे खाली दांगट

| | |
|---|---|
| | वस्ती, ॲक्युरेट कंपनी शेजारी, शिवणे, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे व त्यांचा मित्र अनिकेत शिंदे असे वर नमुद केले ता.वेळी व ठिकाणी रहाते बिल्डींगचे खाली थांबलेले असताना यातील नमुद इसम हे हातात धारदार शस्त्र व बांबु घेवुन फिर्यादी यांचे बिल्डींग जवळ येवुन, आरडा ओरडा व शिवीगाळ करून फिर्यादी यांना बांबुने,लाथा बुक्क्याने मारहाण करून किरकोळ जखमी करून फिर्यादी यांना धारदार शस्त्राचा धाक दाखवुन मारणेची धमकी दिवुन फिर्यादी यांचे पॅन्टीचे खिशातुन पाकिट त्यामध्ये रोख रक्कम १,१०० रू. व आधारकार्डसह काढुन घेवुन, परिसरातील एका रिक्षाची व रॉयल फ्लेक्स प्रिंटींग दुकानाची काच फोडुन नुकसान केले व दहशत निर्माण करून तेथुन पळुन गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.आर.पी क्षिरसागर ९७३०८८८३९ |

# प्रेसनोट

दिनांक २५/०२/२०१९

**छायाचित्र स्पर्धा** "पोलीस इन अॅक्शन नागरीकांची सेवा आणि सुरक्षितेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर विनामुल्य छायाचित्र स्पर्धेबाबत.

पुणे पोलीस आयुक्त, पुणे शहर यांच्या संकल्पनेतून १. प्रेस/ प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार ३. पोलीस खात्यातील अधिकारी/कर्मचारी त्यांचे कुटूंबिय या गटांकरीता "पोलीस इन अॅक्शन - नागरीकांची सेवा आणि सुरक्षिततेसाठी कार्यरत पोलीस" या विषयावर **विनामुल्य छायाचित्र** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर स्पर्धेकरीता हौशी छायाचित्रकार या गटांमध्ये कोणीही नागरिक सहभागी होवु शकतो.

सदर स्पर्धेकरीता प्रथम क्रमांक - रोख ५००० रू व शिल्ड, द्वितीय क्रमांक, - रोख ३००० रू व शिल्ड, तृतीय क्रमांक - रोख २००० रु व शिल्ड व उत्तेजनार्थ २ बक्षीसे देण्यात येणार आहेत.

प्रवेशिका http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळावर उपलब्ध असून फोटो (इमेज) वरील दिलेल्या संकेत स्थळावर **ऑनलाईन** पाठवावेत.

**स्पर्धेसाठीचे नियम व अटी-**

१. प्रत्येक स्पर्धकाने जास्तीत जास्त ५ इमेज JPG फॉरमॅटमध्ये ३०० DPI 5 MB साईजचे ओरीजनल व स्वत काढलेल्या इमेज असाव्यात. इमेजवर कोणत्याही प्रकारचे वॉटरमार्क, लोगो, चिन्ह नसावे
२. दिनांक २५/०२/२०१९ रोजीची ही मुदत दि.१२/०३/२०१९ पर्यंत वाढविली असुन दि.१२/०३/२०१९ पर्यंत प्रवेशिका व फोटो नमुद संकेतस्थळावर स्विकारण्यात येतील
३. निवड झालेले फोटोग्राफ्स हे आयोजक आपल्या प्रदर्शनासाठी व माहिती पुस्तीकेसाठी वापरू शकतील.
४. इमेज पाठविण्यासाठी http//www.pixlent.com/punepolicephotocontet या संकेतस्थळाचा वापर करावा. सदरचे संकेतस्थळ **रजिस्ट्रेशन केल्यानंतरच** या स्पर्धेत भाग घेता येईल.
५. प्रत्येक स्पर्धकाने त्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर देणे आवश्यक आहे.
६. मोबाईल किंवा स्मार्ट फोन ने काढलेली छायाचित्रे सुध्दा स्पर्धेत पाठविता येतील.
७. फोटोग्राफ निवडीसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

**छायाचित्र स्पर्धेसाठी पुणे शहरातील १. प्रेस/प्रोफेशनल छायाचित्रकार, २. हौशी छायाचित्रकार, ३. पोलीस अधिकारी / कर्मचारी तसेच त्यांचे कुटूंबिय असे गट आहेत. हौशी छायाचित्रकार गटात सर्व कॉलेजचे प्रिन्सीपल,व्याख्याते, कॉलेज विद्यार्थी, शिक्षकवृंद, सर्व पत्रकार, उत्सुक व इच्छुक नागरीक यांनी जास्तीत जास्त सहभाग घ्यावा. असे पुणे पोलीसांकडून आवाहन करण्यात येत आहे.**

**अधिक माहितीसाठी- संपर्क अधिकारी-**

१. श्री. अजित लकडे, पोलीस निरीक्षक, विशेष शाखा, पुणे शहर.- ८३२९८०४८३६




# Police in Action

## for Service & Security of People

Pune Police



### Photography Contest!

Open to All!

Participate, in one of three groups:

1. **Amateur/ Hobby Photographers**
2. **Police officers, staff & members of their families**
3. **Press/ Professional Photographers**

Prizes in each Group!

1st: **Rs. 5,000**
2nd: **Rs. 3,000**
3rd: **Rs. 2,000**
Two more consolation prizes

**Entry Free!**

Last Date Extended ...
**12 March 2019**

To take part & know more, go to
**www.pixlent.com/punepolicephotocontest**

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर